राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
महाराष्ट्र, पुणे.

# नवोपक्रम स्पर्धा सन- २०२२-२३

(प्राथमिक शिक्षक गट)

* नवोपक्रमाचे शिर्षक*

# बाहुलीनाट्य- अध्ययन-अध्यापनाचे प्रभावी माध्यम

* स्पर्धकाचे नाव *

श्रीम. वनिता मल्हारी मोरे

(B.A D.Ed)

९९२१७७२६००

* शाळा *

जिल्हा परिषद शाळा खेराडे वांगी ता- कडेगाव जि- सांगली

(U-DISE CODE – 27351103201 )

# • नवोपक्रमकर्ता परिचय •



नाव – श्रीम. वनिता मल्हारी मोरे

पद – उपशिक्षिका

शैक्षणिक अहर्ता- B.A D.Ed.

मोबाईल नं. – 7385018404

ई मेल – vanitatodkarms86@gmail.com

Educational Blog – उंच माझा झोका vanitamore.blogspot.com

YouTube Channel – vanita more

एकूण सेवा – १३ वर्ष

मूळ गाव – मु.पो. रेंदाळ ता- हातकणंगले जि – कोल्हापूर

सध्याचा पत्ता- खेराडेवांगी ता- कडेगाव जि – सांगली

शाळा – जिल्हा परिषद शाळा खेराडेवांगी ता- कडेगाव जि – सांगली

नवोपक्रमाचे नाव – बाहुलीनाट्य – अध्ययन अध्यापनाचे प्रभावी माध्यम

# • अनुक्रमणिका •


| अ.नं. | घटक | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | ३ |
| २ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ३ |
| ३ | नवोपक्रमाची उद्दिष्ट | ४ |
| ४ | नवोपक्रमाचे नियोजन | ४ |
| ५ | नवोपक्रमाची कार्यपध्दती | ७ |
| ६ | नवोपक्रमाची यशस्विता | ११ |
| ७ | समारोप | १२ |
| ८ | संदर्भ सूची व परिशिष्ट | १२ |

१) नवोपक्रमाचे शिर्षक

# बाहुलीनाट्य- अध्ययन-अध्यापनाचे प्रभावी माध्यम

## २) नवोपक्रमाची गरज व महत्व

इयत्ता पहिलीमध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे. पहिली इयत्ता म्हणजे विद्यार्थ्याच्या विकासातील सर्वात महत्वाचा टप्पा होय. शैक्षणिक जडण-घडणीतील महत्वाचा पाया. हा पाया जर मजबूत असेल तरच विद्यार्थीचा सर्वांगीण विकास साधला जाऊ शकतो.

घरापासून आईपासून लांब राहून पहिल्यांदाच शाळेची पायरी चढणारी चिमुकली पावलं शाळेत टिकून रहावीत, रमावीत यासाठी वर्गातील वातावरण त्यांना त्यांच्या भावविश्वातील वाटले पाहिजे यासाठी हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे. बाजारात, यात्रेत, खेळण्याच्या दुकानात मुलांना जायला खूप आवडते कारण त्यांना तिथे त्यांच्या कल्पनेतील गोष्टी मिळत असतात. याच दुव्याचा वापर करून मुलं शाळेत, वर्गात रमावीत रमत असताना आनंदाने शिकावीत यासाठीच हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे.

लहान मुलांना बाहुल्यांचे खूपच आकर्षण असते. त्यांना त्या बाहुल्या त्यांच्या भावविश्वातील वाटतात. त्या बाहुल्यांच्या माध्यमातून कितीतरी अबोल असणारी मुलं व्यक्त होताना दिसतात. याच बाहुल्यांचा वापर करून इयत्ता पहिलीमध्ये शिकणाऱ्या मुलांचा भाषिक विकास साध्य करण्यासाठी, त्यांच्या वाचन क्षमता विकसित करण्यासाठी “बाहुलीनाट्य – अध्ययन अध्यापनाचे प्रभावी माध्यम” हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे.

“प्रयत्न आणि सातत्य ह्या दोन गोष्टी जवळ असल्या तर अशक्य असे काहीच राहत नाही”. या अनोख्या उपक्रमामुळे पहिलीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन आनंददायी व नाट्यीकरण पद्धतीने बोलक्या बाहुल्यांद्वारे करून त्यांच्या बौद्धिक, भावनिक, कार्यात्मक दृष्टीकोनातून विकास करणे साध्य होणार आहे. तसेच अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम याबरोबरच त्यांच्या अनुभव विश्वातील अनुभूती देण्यासाठी व विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंददायी करण्यासाठी “बाहुलीनाट्य – अध्ययन अध्यापनाचे प्रभावी माध्यम” हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे.

## ३) नवोपक्रमाची उद्दिष्टे

१) वेगवेगळया बहुल्यांद्वारे अध्ययन- अध्यापन आनंददायी आणि रंजक करणे.

२) शाळेविषयी, शिकण्याविषयी विद्यार्थांची गोडी वाढवणे.

३) विद्यार्थ्यांचे वाचन – लेखन – संभाषण कौशल्य विकसित करणे.

४) मनोरंजनातून शिक्षण देणे

५) अबोल विद्यार्थांना बोलके करणे.

६) नवोपक्रमाच्या आयोजनानंतर यशस्विता पाहणे.

## ४) नवोपक्रमाचे नियोजन

नवोपक्रमाचे आयोजन माहे १ जुलै २०२२ ते २० ऑक्टोबर २०२२ या कालावधीत केले होते. यासाठी आमच्या जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीच्या ४० विद्यार्थ्यांची या नवोपाक्रमासाठी निवड करण्यात आली.

### अ) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-

उपक्रमासाठी निवडलेल्या इयत्ता पहिलीच्या मुलांच्या पालकांचा मोबईल नंबर मिळवून त्यांचा whats app ग्रुप तयार करण्यात आला. ग्रुपच्या माध्यमातून पालाकंना या उपक्रमाची माहिती सांगण्यात आली. तसेच आवश्यक असणाऱ्या बाहुल्या तयार करण्यात आल्या. या बाहुल्या टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात आल्या. यासाठी जुनी झालेली कार्टून चित्रांची पुस्तके, सॉक्स, आईसक्रिम काड्या यांचा वापर करण्यात आला.

### आ) संबंधित व्यक्तींशी चर्चा :-

या उपक्रमाचे नियोजन करताना आमच्या शाळेचे वरिष्ठ मुख्याध्यापक श्री. ढाणे सर तसेच इतर सहकारी शिक्षक वृंद यांच्याशी चर्चा करण्यात आली. तसेच या उपक्रमातील सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक याच्याशी देखील फोनवर चर्चा करण्यात आली.

### इ) आवश्यक साधने :-

दररोजचे अध्ययन अध्यापन आनंददायी पध्दतीने होण्यासाठी कोणकोणती साधने उपयोगात आणता येतील याचा विचार करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या भाषिक, भावनिक, बौद्धिक, क्रियात्मक विकास होण्यासाठी अभ्यासक्रम पाठ्यपुस्ताकासोबातच त्यांच्या अनुभव विश्वातील अनुभव देण्यासाठी आनंददायी पध्दतीने अध्ययन अध्यापन व्हावे यासाठी विविध

साधनांचा उपयोग करून नियोजन करण्यात आले. यासाठी पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला. उपक्रमाच्या परिणामाचे मापन करण्यासाठी आलेख या साधनाचा वापर केला.

१) भाषा विषयातील मुळाक्षरांच्या दृढीकरणासाठी आणि इंग्रजी विषयातील letters साठी मी स्वतः फिंगर पपेटस तयार केल्या.
२) मुलांमध्ये भाषण- संभाषण कौशल्य विकसित होण्यासाठी गोष्टींवर आधारित काही stick पपेटस तयार केल्या.
३) socks पपेट चा नाट्यीकरणासाठी प्रभावी वापर
४) अभ्यासक्रमावर आधारित वेगवेगळे videos तयार करू ते स्वतःच्या YOUTUBE Channel वर अपलोड केले.
५) सर्व प्रकारच्या बाहुल्या, शब्द कार्ड, वाक्य पट्ट्या, संख्या कार्ड

### ई) कृतींचा क्रम :-

उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापरावयाच्या बाहुल्यांचा, साधनांचा सुयोग्य क्रम ठरवण्यात आला. त्यासाठी वेळापत्रक सुनिश्चित करण्यात आले. उपक्रम राबवणे- मूल्यमापन- यशस्विता तपासणे हा कृतींचा क्रम निश्चित केला.

* whats app ग्रुपची निर्मिती – विद्यार्थ्यांशी, पालकांशी उपक्रमाबाबत चर्चा

* साहित्य निर्मिती

* stick पपेट च्या माध्यमातून मुळाक्षरांची ओळख व दृढीकरण

* मुळाक्षरांवर आधारित video निर्मिती

* नाट्यीकरणातून अध्ययन-अध्यापन

* stick पपेट च्या माध्यमातून इंग्रजी letters ची तयारी

### उ) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

उपक्रमोत्तर स्थिती ही अतिशय समाधान देणारी ठरते. करण ज्या कारणासाठी हा उपक्रम सुरु केला होता त्यामध्ये १००% विद्यार्थी अगदी उत्साहाने प्रतिसाद देताना दिसतात. शाळेविषयी वाटणारी भीती वर्गातील आनंददायी वातावरणामुळे नाहीशी झालेली दिसून आली. तसेच १००% मुलं मुळाक्षरे वाचू लागली, शब्द तयार करू लागली, स्वतःच्या कल्पनेतील वेगवेगळया गोष्टी बाहुल्यांच्या माध्यमातून सांगू लागली.

ऊ) वेळापत्रक :–

सदर उपक्रमासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक तयार करण्यात आले.

| महिना | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|
| जुलै २०२२ | साहित्य निर्मिती. वेगवेगळ्या पपेट वापरून गोष्टींचे सादरीकरण, मुळाक्षरांची ओळख वाचन व लेखन व दृढीकरण. |
| ऑगस्ट २०२२ | बोलक्या बहुल्यांद्वारे अंकांची ओळख व संख्या दृढीकरण. मुलांचे गोष्टी सादरीकरण, नाट्यीकरण |
| सप्टेंबर २०२२ | फिंगर पपेट वापरून शब्द तयार करणे, वाचन लेखन सराव, इंग्रजी letters ओळख व शब्द तयार करणे |
| ऑक्टोंबर २०२२ | video निर्मिती करणे. |

ए) उपक्रमासाठीचे पुरावे :-

* इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमावर आधारित स्वनिर्मित video 'vanita more' या youtubechannel वर अपलोड केलेले आहेत.

* मुलांनी केलेले सादरीकरण channel वर अपलोड केले आहेत (लिंक जोडल्या आहेत.)

* उपक्रम संदर्भातील फोटो जोडले आहेत.

* you tube links जोडल्या आहेत

## ५ ) नवोपक्रम कार्यपद्धती

I. पूर्वस्थितीची निरीक्षणे व नोंदी :- उपक्रमासाठी निवडलेल्या इयत्ता पहिलीच्या मुलांच्या पालकांचा मोबईल नंबर मिळवून त्यांचा whats app ग्रुप तयार करण्यात आला. ग्रुपच्या

माध्यमातून पालाकंना या उपक्रमाची माहिती सांगण्यात आली. तसेच आवश्यक असणाऱ्या बाहुल्या तयार करण्यात आल्या. या बाहुल्या टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात आल्या. यासाठी जुनी झालेली कार्टून चित्रांची पुस्तके, सॉक्स, आईसक्रिम काड्या यांचा वापर करण्यात आला.





II. कार्यावाहीदराम्यान निरीक्षणे व माहिती संकलन :-

१) साहित्य निर्मिती. वेगवेगळया पपेट वापरून गोष्टींचे सादरीकरण, मुळाक्षरांची ओळख वाचन व लेखन व दृढीकरण.





नियोजनाप्रमाणे तयार करण्यात आलेल्या बाहुल्यांच्या मदतीने सुरवातीला मुलांना रंजकता वाटावी यासाटी वेगवेगळी पात्रे असणारी फिंगर पपेट वापरून छोट्या छोट्या गोष्टींचे  सादरीकरण करून दाखवण्यात आले. यामुळे मुलांना शाळेत येण्याची गोडी वाटू लागली. त्या पपेट ते स्वतः हातात घेवून व्यक्त होवू लागली. स्वतःच्या कल्पनेतील गोष्टी रचू लागली. गोष्ट सांगतानाचा video पालकाच्या ग्रुपवर पाठवला जाऊ लागल्यावर मुलांमध्ये गोष्ट सांगण्यासाठी चढा-ओढ लागली. यामुळे मुले बोलती होण्यास खूपच मदत झाली.





https://www.youtube.com/watch?v=5GFkM3MZ9tU&t=5s

मुलाच्या या सहज प्रवृत्तीचा उपयोग करून मुलांना याच बोलक्या बाहुल्यांच्या मदतीने अध्ययानाकाडे वळवले. stick पपेट च्या मदतीने अतिशय रंजक पध्दतीने मुलांना मुळाक्षरांची ओळख करून देण्यात आली. दोन दोन मुलांचे गट करून मुळाक्षरांचे दृढीकरण करून घेण्यात आले. पालकांनी घरी देखीलमुलांचा  सराव घ्यावा यासाठी मुळाक्षरांचे video तयार करू ते ग्रुपवर पाठवले जाऊ लागले.  यामुळे १००% मुलांची मुळाक्षरे पक्की होण्यास मदत झाली.

https://www.youtube.com/watch?v=f7Z_Q3A81vU



२ )  बोलक्या बहुल्यांद्वारे अंकांची ओळख व संख्या दृढीकरण. मुलांचे गोष्टी सादरीकरण, नाट्यीकरण





भाषेची पुरेसी तयारी झाल्यानंतर मुलांना अंकांकडे घेवून जाण्यासाठी वेगवेगळया hand पपेट चा वापर करून अंकांची ओळख आणि दृढीकरण करून घेण्यात आले. दरम्यान मुलांची गोष्ट सांगण्याची तयारी खूपच जोरात चालू होती. अभ्यासासोबत आता मुलं अभिव्यक्ती करू लागली होती. स्वतःच्या भावना मोकळेपणाने गोष्टीच्या माध्यमातून मांडू लागली. घरातील विविध टाकाऊ वस्तूंपासून टिकवू वस्तू तयार करून त्यांचा आनंददायी अध्यापनात उपयोग केला. जुन्या लग्न पत्रिका, चित्रे, यापासून stick पक्षी पपेट तयार केल्या. यामुळे विद्यार्थ्यांची पक्षांविषयी माहिती, पक्षी संभाषण अतिशय प्रभावी आणि आनंददायी झाले.

उदा. उडणारा कावळा वापरून मुलं गोष्ट सांगू लागली. आनंददायी गीते , संभाषण

https://www.youtube.com/watch?v=s2i9HO-NTTs

२) फिंगर पपेट वापरून शब्द तयार करणे, वाचन लेखन सराव, इंग्रजी letters ओळख व शब्द तयार करणे





मुळाक्षरांच्या सरावानंतर आता शब्दाची निर्मिती करणे यासाठी देखील या पपेट चा उपयोग करून अर्थपूर्ण शब्द निर्मिती करण्याची कला मुलांना अवगत करून देण्यात आली. कृतीतून शब्द निर्मिती करणे, अर्थपूर्ण शब्द तयार करणे यासाठी फिंगर पपेट चा उपयोग प्रभावी ठरला. इंग्रजी letters चा योग्य उच्चार होण्यासाठी फिंगर पपेट चा उपयोग करून letters व त्यांचे उच्हार समजावून सांगितले. बहुल्यांमुळे इंग्रजी letters वाचनात मुलांना मजा वाटू लागली. छोटे छोटे इंग्रजी शब्द तयार करून मुलं वाचू लागली.

https://www.youtube.com/watch?v=xMXeAADKnj0

४) video निर्मिती करणे.


मुलांनी सहभाग घेतलेल्या प्रत्येक उपक्रमाचा video तयार करू तो पालकांच्या ग्रुपवर पाठवण्यात आला. यामुळे पालकांनी देखील आपल्या मुलाच्या अभ्यासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. सदरचे सर्व video माझ्या youtube channel वर देखील अपलोड करण्यात आके आहेत. https://www.youtube.com/c/VanitaMore/videos

तसेच इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमावर आधारित सर्व video मी स्वतः तयार करून ते channel वर अपलोड केलेले आहेत. या video मुले मुलांना घरी सरावासाठी योग्य दिशा मिळण्यास मदत झाली.

III. उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण व नोंदी :-

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर केलेल्या निरीक्षणावरून असे लक्षात आले की माझ्या ४० पट असणाऱ्या वर्गात आज एकही मूल मुळाक्षरे ओळखत नाही असे नाही १०० % मुलं मुळाक्षरे चांगल्या प्रकारे ओळखतात. ३० मुलं काना दोन मात्रे पर्यंतचे शब्द वाचन अतिशय चांगल्या प्रकारे करतात. १ ते ३० पर्यंतचे संख्या ओळखतात. इंगर्जी अक्षरे देखील चांगल्या प्रकारे ओळखतात. तसेच वर्गातील बहितांश मुलं अतिशय सुंदर प्रकारे पात्रानुसार वेगवेगळ्या गोष्टींचे सादरीकरण करताना दिसतात.

## IV. माहितीचे विश्लेषण :-




पूर्वस्थिती व अंतिमस्थिती निरीक्षण आलेख स्वरुपात

## ६) नवोपक्रमाची यशस्विता

१) वेगवेगळया बहुल्यांद्वारे अध्ययन- अध्यापन आनंददायी आणि रंजक बनले.

२) शाळेविषयी, शिकण्याविषयी विद्यार्थांची  गोडी वाटू लागली.

३) विद्यार्थ्यांचे वाचन – लेखन – संभाषण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

४) मनोरंजनातून शिक्षण मिळाल्यामुळे मुले शाळेत रममाण झाली.

५) अबोल विद्यार्थी बोलू लागले.

६) नवोपक्रमाच्या आयोजनानंतर हा नवोपक्रम १००% यशस्वी झाला आहे.

## ७) समारोप

जे अवघड आहे ते सोपे करावे

जे सोपे आहे ते सहज करावे

इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल झालेल्या मुलांमध्ये शाळेविषयी वाटणारी भीती कमी करून त्यांना शाळेचे गोडी वाटावी, त्याचबरोबर तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये मुलांच्या भाषिक क्षमता प्रभावीपणे विकसित करण्यासाठी हा नवोपक्रम राबवण्यात आला आहे. ठरवलेल्या नियोजनाप्रमाणे वर्गातील ८० % मुलं चांगल्या प्रकारे वाचन लेखन करू लागली आहेत. तसेच त्यांचे संभाषण कौशल्य अतिशय चांगल्या प्रकारे विकसित होण्यास या नावोपाक्रमामुळे मदत झाली आहे. वर्गातील न बोलणारी मुलं व्यक्त होवू लागली आहेत.

टाकाऊ साहित्यापासून तयार करण्यात आलेल्या stick पपेट, फिंगर पपेट, hand पपेट, socks पपेट या सर्व प्रकारच्या बाहुल्यांच्या प्रभावी वापरामुळे इयत्ता पहिलीतील मुलं बोलकी झाली आहेत. मुळाक्षरांचे वाचन लेखन, शब्द वाचन ,वाक्य वाचन, संख्यांचे वाचन लेखन, इंग्रजी letters ,छोटे शब्द वाचन, नाट्यीकरण, संभाषण या सर्व कला मुलांना अवगत होण्यामध्ये या बोलक्या बाहुल्यांचा सिंहाचा वाटा आहे.

अतिशय कमी कालावधीमध्ये रंजक पध्दतीने मुलांच्या क्षमतांचा विकास होण्यासाठी राबवण्यात आलेला हा नवोपक्रम माझ्या वर्गासाठी १०० % यशस्वी झाला आहे याचे मनस्वी खूप समाधान आहे.

## ८) संदर्भ सूची व परिशिष्टे

### १) संदर्भ सूची

१) माशाळे सिद्धराम – उपक्रमशिलतेकडून कृतीसंशोधानाकडे प्रकाशन,सोलापूर.

२) google ,विकिपीडिया

३) जीवनशिक्षण मासिक

४) इयत्ता १ ली पाठ्यपुस्तक

५) kinemaster app

६) किशोर मासिक

७) vanita more educational youtube channel

२) परिशिष्ट :-

२) Youtube links

मनोरंजनातून शिक्षण १ ची ओळख

मनोरंजनातून शिक्षण काना ओळख

मनोरंजनातून शिक्षण शब्दनिर्मिती भाग १

मनोरंजनातून शिक्षण शब्दनिर्मिती भाग २

मनोरंजनातून शिक्षण शब्दनिर्मिती (इंग्रजी ) भाग ३

मनोरंजनातून शिक्षण शब्दनिर्मिती (इंग्रजी ) भाग ४

चला गोष्ट सांगूया १

चला गोष्ट सांगूया २

चला गोष्ट सांगूया ३

शब्द वाचन १

शब्द वाचन २

डिजिटल मुळाक्षरे

डिजिटल अल्फाबेट

मुळाक्षरांची ओळख व लेखन सराव भाग १ ते ९

चला शब्द वाचूया काना ते अनुस्वार शब्द वाचन

इयत्ता पहिली नवोपक्रमात सहभागी विद्यार्थी यादी

| अ.नं | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|
| १ | साई सूर्यवंशी |
| २ | श्रद्धा सूर्यवंशी |
| ३ | ईश्वरी सोनावणे |
| ४ | स्वर पाटील |
| ५ | शौर्य सूर्यवंशी |
| ६ | वेदांत सूर्यवंशी |
| ७ | रितेश मोहिते |
| ८ | तनिष सूर्यवंशी |
| ९ | सानिका सूर्यवंशी |
| १० | नमिता जगताप |
| ११ | मंथन  सूर्यवंशी |
| १२ | गौरवी तुपे |
| १३ | माधवी सूर्यवंशी |
| १४ | स्वराली जगताप |
| १५ | यश हजारे |
| १६ | प्रेम कुंभार |
| १७ | शिव सूर्यवंशी |
| १८ | जान्हवी सूर्यवंशी |
| १९ | ऋषी मासल |
| २० | प्रगती पवार |
| २१ | प्राविण्य कोळी |
| २२ | जुई सूर्यवंशी |
| २३ | आरोही सुतार |
| २४ | तुषार जाधव |
| २५ | नादिरा पटेल |
| २६ | मृणाल सूर्यवंशी |
| २७ | स्वराज हजारे |
| २८ | राजवीर कदम |
| २९ | स्वरा पोळ |
| ३० | वेदिका पवार |
| ३१ | कार्तिक कांबळे |

| | |
|---|---|
| ३२ | शरयू गुरव |
| ३३ | आरोही जगताप |
| ३४ | स्वरा खवले |
| ३५ | प्रणव सूर्यवंशी |
| ३६ | राहत शेख |
| ३७ | रुद्र मदने |
| ३८ | ऐश्वर्या सूर्यवंशी |
| ३९ | प्रज्ञा पिसाळ |
| ४० | कार्तिकी सूर्यवंशी |